ISSN 2278-8808
An International Peer Reviewed
SJIF 2013 = 4.194
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# समाजकार्य : इतिहास आणि पध्दती

**प्रा. धनंजय लोखंडे, Ph. D.**

*संचालक व विभागप्रमुख, प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग,*

*पुणे विद्यापीठ, पुणे– ७.*

***महत्त्वाच्या संज्ञा :*** *समाजकार्य, सामाजिक सेवा, समाजकल्याण, प्रशासन, समाज संघटन, सामाजिक संशोधन, व्यक्ती सहयोग कार्य, गटकार्य.*

‘समाजकार्याची आवड आहे’ समाजकार्य करीत असतो. असे सांगणारी अनेक मंडळी समाजात दिसतात; परंतु समाज म्हणजे काय? सामाजिक कार्य म्हणजे काय सामाजिक सेवा म्हणजे काय? समाजकल्याण म्हणजे काय? याबाबी त्यांना माहित असतात असे नाही. आदिकालापासून लोक एकमेकांना मदत करीत आहेत. त्यामागील प्रेरणा मानवतेची किंवा धार्मिकतेची देखील असू शकेल.

साधारणपणे चार प्रकारचे कार्यकर्ते समाजात दिसून येतात. काहीजण मिशनरी वृत्तीने काम करणारे असतात. समाजातील दुर्लक्षित लोकांची सेवा करावी, या विशाल दृष्टीकोनातून ते त्यांचे काम करतात. भौतिक सुख आणि आकांक्षा यापासून दुर असतात आणि धार्मिक प्रेरणा असते. समाजवादी—गांधीवादीदेखील कार्यकर्ते असतात. निष्ठा, ध्येयवाद जिद्द असते. कामाला तात्त्विक बैठक असते. व्यापक कल्पना असतात. कृतीच्या प्रमाणात जास्त लक्ष केंद्रीत असतात. तिसरा गट स्वयंसेवी कार्यकर्त्यांचा. दुसऱ्यांसाठी काहीतरी करण्यासाठी कळकळ असते. दुसऱ्याचे दुःख हलके करण्याची तीव्र इच्छा असते. चौथा आणि महत्त्वाचा प्रकार म्हणजे प्रशिक्षित, व्यावसायिक समाज कार्यकर्ते. हे वैज्ञानिक दृष्टीकोन ठेवतात. समाजकार्याला आवश्यक असे तंत्रज्ञान असते. पण ध्येयवादाचा पगडा यांच्यावर असेलच असे नाही.

आजच्या बदलत्या काळात समाजकार्य हे फावल्या काळातले काम नव्हे. डॉक्टर ज्याप्रमाणे एखाद्या रोग्याचे निदान करतो नंतरच उपाय योजना करतो, त्याचप्रमाणे समाजकार्यातसुद्धा आहे. याचा अर्थ समाजकार्यकर्त्याला समाजकार्याचे प्रशिक्षण असणे अतिशय गरजेचे आहे.

**समाजकार्य प्रशिक्षणाचा इतिहास**:—

इंग्लंड आणि अमेरिका या देशांच्या समाजकार्याच्या शिक्षणाला तीन अवस्थांपासून सुरवात झाली. नोकरीत असताना प्रशिक्षण देणे, संस्थांमार्फत अल्पमुदतीचे अभ्यासक्रम घेणे, आणि स्वतंत्रपणे समाजकार्याच्या प्रशिक्षण देणाऱ्या संस्था, की ज्या खाजगी किंवा विद्यापीठसंलग्न होत्या. सन १८९० साली व्यावसायिक पद्धतीचे शिक्षण देणारी पहिली संस्था इंग्लंडमध्ये स्थापन झाली. अमेरिकेत १८९८ साली न्युयार्कमध्ये 'न्युयार्क चॅरिटी ऑरगनायझेशन' स्थापन झाली. भारतात—मुंबई भायखळा येथे समाजकल्याण केंद्र आहे; 'नेबरहुड हाऊस' या केंद्राचे प्रमुख डॉ. क्लिफर्ड मॅन्सहार्ट हे होते. भारतात समाजकार्याच्या प्रशिक्षणाची गरज आहे, असे त्यांना वाटल्याने सर दोराबजी टाटा ट्रस्टच्या मदतीने एक संस्था स्थापन केली. 'सर दोराबजी टाटा स्कुल ऑफ सोशल वर्क' मुंबई १९३६ साली आता या संस्थेला 'टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्स' असे म्हटले जाते. भारतातील ही पहिली संस्था. समाजसेवा, समाजकार्य, समाजकल्याण, समाजसुधारणा, समाजशिक्षण या फार व्यापक अशा संकल्पना आहेत.

गरजेच्यावेळी एखाद्या गटाला स्वयंसेवी पद्धतीने ज्यावेळी मदत केली जाते, त्याला ढोबळ मानाने समाजसेवा म्हटले जाईल. उदा. उन्हाळयात फुकट पानपोई सुरू करणे, आपद्ग्रस्तांना तत्काळ मदत करणे, अंधाला रस्ता ओलांडून देणे इ. बाबी यात येतात. समाज कार्यामध्ये 'लोकांचे प्रश्न लोकांनीच सोडवावेत' अशा पद्धतीने लोकांना मदत करणे हे अभिप्रेत आहे यात कार्यकर्त्यांकडे समाजकार्याची तंत्र आणि कौशल्ये असतात. हॅरी कॅसिडो यांनी सामाजिक सेवांची व्याख्या केली आहे......''समाजाच्या (कल्याणासाठी), सुसंघटित रीतीने अंगीकारलेले आणि राबविलेले कार्यक्रम, याला सामाजिक सेवा अशी संज्ञा आहे. या सर्व सेवांचे उद्दिष्ट म्हणजे मानवी संपत्तीचे रक्षण करणे आणि त्यांच्यात सुधारणा घडवून आणणे हा होय. सामाजिक विकास हा सामाजिक सेवांचा हेतू असतो. आरोग्यसेवा, घरबांधणी, शेती विकास, शिक्षणसेवा इत्यादी सेवा म्हणजे सामाजिक सेवा होय. समाजकल्याण या संकल्पनेमध्ये व्यक्तीचा आणि संपूर्ण समाजाचा सर्वांगीण विकास अभिप्रेत आहे. दुर्गाबाई देशमुख यांनी समाजकल्याणाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

'समाजकल्याण' या शब्दाच्या व्याप्तीत अंतर्भूत असलेली कल्पना ही भिन्न आहे. समाजकल्याण म्हणजे समाजातील दुर्बल आणि गरजू अशा घटकांसाठी राबविल्या जाणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या सेवा होय. हे घटक म्हणजे बालक, स्त्रिया, अपंग, अनुजाती—जमाती इ. प्रत्येक संकल्पना म्हणजे एक स्वतंत्र विषय आहे. त्याचप्रमाणे समाजकार्याच्या पद्धतींचे आहे. समाजकार्याच्या मुख्यत: सहा पद्धती आणि तंत्रे आहेत. व्यक्तीसहयोग कार्य (सोशल केस वर्क), गट कार्य (ग्रुप वर्क), समाज संघटन कार्य (कम्युनिटी ऑरगनायझेशन), समाजकल्याण

प्रशासन,(सोशल वेल्फेअर ॲडमिनिस्ट्रेशन), सामाजिक संशोधन(सोशल रिसर्च) आणि सामाजिक चळवळ/कृती (सोशल ॲक्शन).

पर्लमन यांच्या मतानुसार व्यक्ती सहयोग कार्य म्हणजे मानवनिर्मित संस्थांनी व्यक्तींना, त्यांच्या सामाजिक जीवनात आलेल्या समस्या सोडविण्यासाठी अवलंबिलेली कार्य प्रक्रिया होय. व्यक्ती सहयोग पद्धतीच्या तीन पायऱ्या आहेत. त्यात व्यक्तीचा अभ्यास (केस स्टडी), निदान (डायग्नासिस)आणि उपचार (ट्रिटमेंट). एखादा रूग्ण डॉक्टरकडे जाऊन आजाराची लक्षणे सांगतो. डॉक्टर, त्यानुसार निदान करतात आणि त्यानंतरच त्यावर उपचार करतात. काही वेळा दोन व्यक्तींना आजार एकच असू शकतो; परंतु निदान मात्र वेगवेगळे होते. उदा. डोकेदुखी निदान एकाचा नेत्रदोष तर दुसऱ्याचा मेंदुतील विकार. म्हणजे दृश्य लक्षण एक; पण कारणे वेगवेगळीही. त्यामुळे उपचार ही वेगळा. व्यक्तीसहयोग कार्यात देखील व्यक्तीच्या व्यथा वेगळया आणि उपचार देखील वेगळे. या पद्धतीमध्ये व्यक्ती, व्यक्तीच्या समस्या, ठिकाण, प्रक्रिया, व्यक्तीसहयोग कार्यकर्ता आणि अडचणीत असलेली व्यक्ती यांचे संबंध, आणि समस्या सोडविणारे काम हे सर्व घटक यात अभिप्रेत आहेत.

**व्यक्ती सहयोग** कार्याची काही तत्वे देखील आहेत. व्यक्तिसहयोग कार्यकर्त्याने अडचणीत सापडलेल्या व्यक्तीची आहे तशी स्वीकृती केली पाहिजे, व्यक्तीचा आदर केला पाहिजे, हेतुपुरस्तर हितसंबंध निर्माण केले पाहिजेत, व्यक्तीचा प्रश्न सोडवू शकू, अन्यथा कार्यकर्त्याचा विश्वास असला पाहिजे, कार्यकर्त्याने भावनिक होऊ नये, व्यक्ती ही समाजाचा एक घटक आहे, अशी भावना कार्यकर्त्याने ठेवली पाहिजे. आणि शेवटी व्यक्तीच्या प्रश्नाचे गांभीर्य कार्यकर्त्याला असावे, आणि व्यक्तीविषयी सहानुभुती असावी. व्यक्तीने दिलेल्या माहितीची गुप्तता आणि विश्वास कार्यकर्त्याने जपला पाहिजे. आणि सर्व माहितीची नोंद त्याने ठेवली पाहिजे.

**गटकार्यात** प्रामुख्याने प्रत्येकाला मदत गटात केली जाते. गट स्थापन करण्याच्या हेतूमध्ये गटातील सदस्यांनी उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, समस्या सोडविण्याची जबाबदारी स्वीकारणे, नेतृत्वविकास, कामाचे वाटप, आणि भावनिक सुरक्षितता इ. बाबी असतात. गटकार्य करत असताना गटाची बांधणी नियोजनबद्ध असली पाहिजे. ठराविक उद्दिष्ट निश्चित केले पाहिजे. आणि सदस्यांमध्ये आंतरक्रिया झाली पाहिजे, गटाचे संघकार्य लोकशाही तत्त्वावर झाले पाहिजे, इ. गटांमध्ये विविध प्रकारचे उपक्रम राबविले जावेत, त्यात ,खेळ, सहली, प्रकल्प भेट, चर्चा, दृक श्राव्य साधनांचा वापर, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींचा समावेश यात होऊ शकतो.

**समाज संघटन कार्याच्या** पद्धतीत काही पायऱ्यांचा विचार करावा लागतो. त्यात अनौपचारिकपणे व औपचारिकपणे वस्तीचा सर्वे करणे आवश्यक आहे. यामध्ये वस्तीचा इतिहास, भौगोलिक क्षेत्र, लोकसंख्या, मिटिंगसाठी सार्वजनिक ठिकाण, वस्तीतील रूढी—परंपरा, शैक्षणिक

दर्जा, आर्थिक स्थिती, आरोग्य सोयी इत्यादी बाबी पाहाव्यात. त्यानंतर वस्तीतील गरजा शोधून त्यांचा क्रम लावणे, गरजांच्या पूर्ततेसाठी पद्धती आणि तंत्रशोधणे उपलब्ध साधनांचा वापर करणे. स्वयंसेवी संस्थांशी समन्वय ठेवणे आणि सातत्याने केलेल्या कामाचे मूल्यमापन आणि पाठपुरावा करणे आवश्यक आहे. समाज, संघटनामध्ये अनेक प्रकारची क्षेत्रे येत असतात. त्यात आर्थिक विकास, शिक्षण, आरोग्य, रस्ते आणि घरे, मनोरंजन, सास्कृतिक कार्यक्रम, सामाजिक सेवा उदा. सांडपाणी, समाजविकास केंद्र बांधणे, गरीब आणि रूग्णांसाठी सेवा इ. बाबींचा समावेश करता येईल. याशिवाय वस्तीतील गरजांवर आधारित कार्यक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणी करणे.

**समाजकार्य प्रशासनात** नियोजन, संघटन, सुसूत्रीकरण, कामाची दिशा, कर्मचारीवर्ग, कामकाजाच्या विविध नोंदी आणि कामासाठी येणारा खर्च इ. बाबी अभिप्रेत आहेत. प्रशासनाच्या क्षेत्रामध्ये नियोजन आणि धोरण ठरविणे, संघटन आणि यंत्रणा, घटक आणि कार्यकारी मंडळाची कामे, पर्यवेक्षण आणि नेतृत्व, विशेषीकरण आणि सुसूत्रीकरण, नोंदी—मूल्यमापन आणि संशोधन, जनसंपर्क आणि केलेल्या कामाच्या नोंदी ठेवणे हे कार्यकर्त्यांच्या दृष्टीने आवश्यक आहे.

**सामाजिक संशोधनही** समाजकार्याची अप्रत्यक्ष अशी पद्धत आहे. सामाजिक संशोधन म्हणजे काळजीपूर्वक चिकीत्सक आणि व्यवस्थित असा केलेला अभ्यास होय. त्यामुळे एखादी समस्या सोडविण्यासाठी नवनवीन माहिती संशोधनाव्दारे उपलब्ध होऊ शकते. संशोधनाच्या साधनांमध्ये मुलाखत प्रपत्र, प्रश्नावली, मुलाखती, भेटी. आणि विविध प्रकारच्या नोंदी यांचा उपयोग करता येतो.

**सामाजिक कृत्ती** म्हणजेच एक लोकचळवळ सामाजिक कृतीच्या पद्धती आणि तंत्रामध्ये संशोधन आणि माहिती जमा करणे, उपायांबाबतचे नियोजन आणि जनतेचे मत अजमावणे, मंडळे—संस्था आणि प्रमुख व्यक्तींच्या बैठका घेणे, जाहीर सभा, समाज शिक्षण, प्रचार, चर्चा, जनमताचा कानोसा, बिनसरकारी संस्था, स्वयंसेवी संस्था यांचा समन्वय, प्रस्ताव संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर करणे, सामाजिक कायदे, इ. बाबी या पद्धतीत समाविष्ट आहेत. सामाजिक कृतीमधून बरेच प्रश्न सामूहिक कृतीतून सोडवता येतात. उदा. हुंडा पद्धती, दारूबंदी, अस्पृश्यता, जमीनदारी पद्धती, अंधश्रध्दा, बालविवाह इ.

समाजकार्याच्या या सहा पद्धधती आणि तंत्रे मानवी परिस्थितीनुसार त्यांचा वापर करावा लागेल. या प्रत्येक पद्धधती काही तंत्र आहेत, तत्त्वे आहेत, पायऱ्या आहेत, घटक आहेत. या सर्वांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. सदर लेखात सर्व बाबी विस्तृत स्वरूपात मांडता आल्या नाहीत. ऊठसूट कोणीही समाजकार्य करतो म्हणणाऱ्यांनी या बाबींचा गांभीर्यायाने विचार केला पाहीजे. समाजकार्य करणे हे सोपे काम नाही. समाज ही एक प्रयोगशाळा मानल्यास कार्यकर्त्यांने कार्यक्रमाचे आयोजन करून प्रयोग करणे आवश्यक आहे. समाजकार्याची अनेक क्षेत्रे आहेत. त्यात

बालकल्याण, युवक कल्याण, महिला कल्याण, अपंग कल्याण, सामाजिक सुरक्षा, समाजकल्याण, वैद्यकीय आणि मानसिक समाज कल्याण, निराधार आणि वयोवृद्ध कल्याण, इत्यादी.

थोडक्यात समाजकार्य हे कोणालाही करता येते असे नाही, तर त्यासाठी प्रशिक्षणाची—अभ्यासाची—चिंतनाची—अनुभवाची आणि सर्वात महत्वाचे समाजपरिवर्तनाची आणि बांधिलकीची नितांत गरज आहे.

**संदर्भ ग्रंथः**

*१) इंट्रॉडक्शन टु सोशल वर्क (२०००)— डॉ. डी. पॉल चौधरी, चौथी आवृत्ती, आत्मा राम अॅन्ड सन्स. दिल्ली — लखनौ.*
*२) सोशल वर्क — फिलॉसॉफी अॅण्ड मेथड, (१९९४) पी. डी. मिश्रा, इंटर — इंडिया पब्लीकेशनस्, नवी दिल्ली.*
*३) व्यक्ती — सह — कार्य — भाग १ (२००३) डॉ. प्राजक्ता टांकसाळे, श्री. मंगेश प्रकाशन, नागपुर.*
*४) व्यक्तीसह — कार्य भाग २ (२०१०), डॉ. प्राजक्ता टांकसाळे, श्री. मंगेश प्रकाशन, नागपुर.*